# महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

## "सहायक प्रशासन समन्वयक" या पदासाठी जाहिरात.

महामंडळाच्या सद्यस्थितीतील कामाचे स्वरुप व कर्मचाऱ्यांची अपूरी संख्या विचारात घेवून सरळसेवेने भरती होईपर्यंत किंवा ११ महिन्याच्या कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहुन शासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी मुलाखतीद्वारे कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

| अ. क्र | पदाचे नाव | पद संख्या | अर्हता | पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्रशासन समन्वयक | १ | मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी (गट-ब) या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी | महामंडळातील आस्थापना विषयक बाबी, विधानमंडळ कामाकाज, सेवा प्रवेश नियम, पदांचा आढावा, सेवा-शर्ती नियम, अनुकंपा, बिंदू नामावली, आश्वासित प्रगती योजना व पदोन्नती विषयक बाबी, सरळसेवा भरती, विभागीय चौकीशी विषयक प्रकरणे, सेवा पुस्तके अद्यावत ठेवणे व इतर विवक्षित कामे. |

**१. अर्हता:-** अ) वय वर्ष ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

ब) शारिरीक व बौध्दिकदृष्ट्या कार्यक्षम असणे आवश्यक.

क) मराठी, हिंदी आणि इंग्रजी लिहिण्या व वाचण्याची क्षमता आवश्यक.

ड) कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी झालेली, प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी.

**२. वित्तलब्धी :-** सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ नुसार

३. अर्जाचा नमुना व इतर अनुषंगीक बाबी महामंडळाच्या www.filmcitymumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, सेवेत असताना सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाच्या पुराव्यार्थ आवश्यक त्या (उदा. सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन प्रमाणपत्र) साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात अचूक भ्रमणध्वनी नमूद करुन खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑन लाईन दि.१८.०६.२०२६ सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांचा अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी,

व्यवस्थापकीय संचालक

म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

"सहायक प्रशासन समन्वयक" या पदासाठी अर्जाचा नमुना :-

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | अर्ज करत असलेल्या पदाचे नाव | |
| ३ | जन्म तारीख | |
| ४ | पत्रव्यवहारासाठीचा पत्ता | |
| ५ | ई- मेल | |
| ६ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | |
| ८ | सेवा निवृत्ती दिनांक व सेवा निवृत्तीच्यावेळी कार्यरत असलेल्या कार्यालयाचा तपशील | |
| ९ | सेवा केलेल्या कार्यालयाचा तपशील व कालावधी | |
| १० | सेवा निवृत्तीच्या वेळी  धारण केलेले पद | |
| ११ | विभागीय चौकशी झालेली / प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १२ | सेवा निवृत्ती वेळेचे वेतन प्रमाणपत्र व निवृत्ती वेतन मिळत असल्यास निवृत्ती वेतन प्रमाणपत्र | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी